**दिनांक : २३ -१०-२३**

**विषय : दिनांक २२/१०/२३ रोजी झालेल्या संस्थे च्या सर्व साधारण सभेचा वृत्तांत.**

दिनांक ७/१०/२३ ला दिलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने दिनांक २२/१०/२३ रोजी पत्रकार नगर गृह रचना संस्थे ची सर्व साधारण सभे ची सुरुवात, संस्थे च्या मधुकर जोशी सभागृहात, सकाळी १०.३० ला करण्यात आली. कोरम च्या अभावी ही सभा अध्यक्ष श्री विजय सावंत यांनी तहकूब केली आणि नंतर ११.०० वाजता ही सभा परत सुरू करण्यात आली.

ह्या सभेला एकूण ६९ सभासद् / सहयोगी सभासद उपस्थित होते. सर्वात प्रथम अध्यक्षांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून सभे चे कामकाज पुढे चालविन्यास सचिव श्री विनायक पटवर्धन यांच्या कडे सभेची सूत्रं दिली.

सचिवांनी सुरवाती ला ही सभा संस्थेच्या पुनर्निर्माण प्रकल्पात संस्थे च्या सभासदांन मधे वाढीव FSI वाटपा संबंधी झालेली सहमति , ही प्रक्रिया पुढे नेताना आवश्यक असणाऱ्या शासकीय, निम शासकीय कागद पत्रांवर, करारनाम्यानवर सह्या करण्या साठी संस्थे चे अध्यक्ष, सचिव आणि पंच समिती सदस्यांना अधिकृत करण्या साठी आणि संस्थे च्या सध्या असलेल्या मिळकती ला भोगवटा वर्ग २ मधून भोगवठा वर्ग १ मधे बदलून घेण्या करिता सभासदांची मंजुरी घेण्या साठी असल्याचे सांगितले.

ह्या नंतर त्यांनी एक एक करून तिन्ही ठराव सभे पुढे मतदाना साठी मांडले. हे ठराव आणि त्यांना मिळालेल्या मतांचे डिटेल्स खालील प्रमाणे.

* ठराव क्रमांक १ :-
संस्थे चे पुनर्विकास करतांना सभासदांना मिळणार्या वाढीव FSI बाबत दिनांक ३, ४ आणि १७ ऑक्टोबर, २३ रोजी आयोजित सभासदांच्या सभां मधे झालेल्या सहमती अनुसार मान्यता देणे.

| सध्या असलेले. क्षेत्रफळ (वर्ग फूट). | पुनर्निर्माणा नंतर ममिळणारे क्षेत्रफळ (वर्ग फूट) |
|---|---|
| ६८५ (१० फ्लॅट्स). | १६१५ |
| ७१६ (२०). | १६८३ |
| ८५५ (३०). | १८७२ |
| १०२६ (२). | २१७२ |
| १०६२ (१०) | २२५१ |
| ११७२ (४). | २४९२ |
| १२०६ (१४) | २५६६ |
| ८९४ (१२). | १९६१ |

सूचक - श्री यशवंत रा. केंजले
अनुमोदक - श्री अभिजीत वारघडे

सदर ठराव ६८ विरुद्ध १ मताने मंजूर झाला.

* ठराव क्रमांक २ :-
ही सभा संस्थेच्या पुनर्निर्माण प्रक्रियेत आवश्यक असलेल्या विकसका बरोबरच्या (LOI मधे दिलेल्या अटी आणि शरतींच्या आधीन) तसेच इतर कायदेशीर बाबीत सर्व कागद पत्रे, करार नामे इत्यादींवर

संस्थेच्या वती ने सह्या करण्यासाठी संस्थे चे अध्यक्ष, सचिव आणि पंच समिती सदस्यांना अधिकृत करीत आहे.

सूचक - श्री महेश प्रभुदेसाई

अनुमोदक - श्री सुरेशचंद्र पाध्ये

वरील ठराव ६९ विरद्ध ० मताने मंजूर झाला

* ठराव क्रमांक ३ :-
संस्थे ची सध्या असलेली मिळकत भोगवठा वर्ग २ मधून भोगवठा वर्ग १ मधे करण्या साठी आवश्यक कार्यवाही करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सूचक - श्री जयराम देसाई

अनुमोदक - श्री भूषण तळवलकर

वरील ठराव ६९ विरुद्ध ० मता ने मंजूर झाला.

सर्वांना सहकार्यासाठी धन्यवाद देऊन अध्यक्षांना सभा संपल्याचे जाहीर केले.

**सचिव पंच समिती**